नियमित दिवाणी दावा क्र.७७/२०१५
लैलाबी वि. इनायतबी व इतर
नि.क्र.९५/ क (सोबत)

<u>वादी तर्फे साक्षीदार क्र.२</u>

**<u>उलट तपासणी प्रतिवादी क्र.४ तर्फे वकील श्री. यु.एस. जाधव यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. मी वादीचे सासरे नबीसाबच्या शेताजवळ अथवा घराजवळ राहत नाही. वादी क्र.१ लैलाबी हिचे वडील माझ्या वडीलांचे मित्र होते. नबीसाबच्या जमिनीच्या चतुःसीमा मला सांगता येणार नाही. वादीची एकुण जमीन अंदाजे १२ ते १२.५० एकर आहे. सदर जमीन सर्वे नं.२, ३ व ११४ मध्ये आहे. सर्वे नं.२ मध्ये एकुण किती जमीन आहे हे मला सांगता येणार नाही. नबीसाब २००४ मध्ये मयत झाले. सिराजोद्दीन नबीसाबनंतर ४ वर्षानी मयत झाले. नबीसाब व माझी २००३ मध्ये भेट कधी झाली होती, परंतु कोणत्या तारखेला व कोणत्या मोसमात झाली होती हे मी निश्चीतपणे सांगू शकत नाही. मी मृत्युपत्र अथवा हिबानाबावर सही केली नाही. मला स्वतः नबीसाबने मृत्युपत्र व हिबानामाबाबत सांगितले होते.

२. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.१ ने तिच्या नवऱ्याविरुध्द पोटगीकरीता केस केली होती. पोटगी न भरल्यामुळे तिचा नवरा जेलमध्ये गेला होता याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.१ ने तिच्या नवऱ्याला जेलमध्ये पाठविल्यामुळे नबीसाबचा तिच्यावर राग होता. सिराजोद्दीन हा नबीसाबचा एकुलता एक मुलगा होता.

**कोर्ट प्रश्न-** लैलाबीने सिराजोद्दीनविरुध्द पोटगीची केस दाखल करण्याअगोदर नबीसाबची व तुमची भेट झाली होती का त्यानंतर झाली होती?

**उत्तर-** ते मला आठवत नाही.

माझी व नबीसाबची भेट झाल्यावर नबीसाब एक वर्षानी मयत झाले. मी मृत्युपत्र व हिबानामा पाहिलेला आहे. मृत्युपत्र व हिबानामा हे एकच कागदपत्र आहे. सदर मृत्युपत्र व हिबानामा किती रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर आहे हे मी पाहिले नाही. सिराजोद्दीनला एकच अपत्य आहे. सिराजोद्दीनचे वारस प्रमाणपत्र मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.१ ही माझ्या मित्राची मुलगी असल्यामुळे मी साक्षीला आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मित्राच्या मुलीच्या फायद्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. एस.एन. सोमवंशी यांनी प्रतिवादी क्र.४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास आहे तसा स्वीकारला.</u>**

उलटतपास – संपला. फेरतपास – नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि.०५/०८/२०२४

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.